<u>नवी मुंबई महानगरपालिका</u>

<u>महापालिका विशेष सर्वसाधारण सभा</u>

महानगरपालिकेच्या गुरूवार, दिनांक 07 मार्च 2019 रोजी भरलेल्या विशेष सर्वसाधारण तहकूब सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरूपात खालीलप्रमाणे आहे.:-

| | |
|---|---|
| **विषय क्र. 1**<br>**दिनांक 5 मार्च 2019** | नवी मुंबई महानगरपालिकेचा सन **2018-2019** चा सुधारीत आणि सन **2019-2020** चा अर्थसंकल्प "अ" आणि "क." |
| **ठराव क्र. 1077**<br>**दिनांक 07 मार्च 2019** | सन 2019-2020 चा अर्थसंकल्प “अ” आणि “क” यामध्ये विविध लेखाशिर्षांतर्गत फेरबदल करुन मंजूर केल्यानुसार नवी मुंबई महानगरपालिकेच्या सन 2019-2020 चा अर्थसंकल्प “अ” आणि “क” करीता आरंभीची महसूली आणि भांडवली तसेच प्रकल्पामधील एकूण शिल्लक रु 1084 कोटी 65 लक्ष 92 हजार जमेस धरुन एकूण महसूली व भांडवली त्याचप्रमाणे प्रकल्पामधील रकमेसह एकूण जमा उत्पन्न रुपय 4020 कोटी 13 लक्ष 44 हजार तर एकूण महसूली आणि भांडवली त्याचप्रमाणे प्रकल्पामधील रकमेसह एकूण खर्च रुपये 4019 कोटी 22 लक्ष 44 हजार आणि वर्षाअखेर रुपये 91 लक्ष शिल्लक राहील.याप्रमाणे फेरफार करण्यात आलेला अर्थसंकल्प "अ" आणि "क" मंजूर करण्यात यावा." |
| **निर्णय** | **मंजूर** |
| **विषय क्र. 2**<br>**दिनांक 5 मार्च 2019** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाचा सन **2018-2019** चा सुधारीत आणि सन **2019-2020** चा अर्थसंकल्प "ब." |
| **ठराव क्र. 1078**<br>**दिनांक 07 मार्च 2019** | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाचा सन 2019-2020 चा आरंभीची शिल्लक **रुपये 06 लाख 96 हजार** जमेस धरुन एकूण महसुली आणि भांडवली उत्पन्न **रुपये 305 कोटी 78 लाख 19 हजार** आणि वर्षा अखेरची शिल्लक **रुपये 05 लाख 10 हजार** यासह एकूण महसुली आणि भांडवली खर्च **रुपये 305 कोटी 80 लाख 05 हजार** इतक्या रकमेचा अर्थसंकल्प "ब" मंजूर करण्यात यावा." |
| **निर्णय** | **मंजूर** |
| **विषय क्र. 3**<br>**दिनांक 5 मार्च 2019** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या वृक्षप्राधिकरणाचा सन **2018-2019** चा सुधारीत आणि सन **2019-2020** चा अर्थसंकल्प. |
| **ठराव क्र. 1079**<br>**दिनांक 07 मार्च 2019** | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या वृक्षप्राधिकरणाचा सन 2019-2020 चा आरंभीच्या शिल्लकेसह एकूण जमा **रुपये 35 कोटी 17 लाख 56 हजार** व खर्च **रुपये 33 कोटी 22 लाख 90 हजार** आणि वर्षा अखेरची शिल्लक **रुपये 1 कोटी 94 लाख 66 हजार** इतक्या रकमेचा अर्थसंकल्प मंजूर करण्यात यावा." |
| **निर्णय** | **मंजूर** |

**सही/-**

**(चित्रा बाविस्कर)**

**महापालिका सचिव**

**नवी मुंबई महानगरपालिका**